॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 **NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT** website: srtmun.ac.in
Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र.: रासेयो/२०२५—२६/३६०  दिनांक : १७/०२/२०२६

परिपत्रक

प्रति,
मा.प्राचार्य/रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो.राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय: दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त महाराष्ट्र राज्यात "पदयात्रा" आयोजित करणे बाबत.**

संदर्भ: १) मा. डॉ. मिलिंद काळे, राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन. मुंबई यांचे जा.क्र. रासेयो—२०२६/प्र.क्र.१४/रासेयो कक्ष.दि. १६ फेब्रुवारी २०२६.
२) डॉ. पल्लवी जैन गोविल, भा.प्र.से., सचिव, भारत सरकार, युवा कार्यक्रम आणि खेल मंत्रालय, युवा कार्यक्रम विभाग, यांचे जा.क्र.D.O.No.J.17011/521/2025-MyBharat Dated 12 Feb. 2026

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भ क्र. २ च्या अनुषंगाने मा. डॉ. मिलिंद काळे, राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन. मुंबई यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती देशभरात मोठया श्रध्देने व उत्साहाने साजरी केली जाते. या पार्श्वभूमीवर, भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रिडा मंत्रालयामार्फत MY Bharat (मेरा युवा भारत) महाराष्ट्रातील सर्व जिल्हयांमध्ये **दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी महाराष्ट्र राज्यात "मेगा पदयात्रा"** या व्यापक युवक जनजागृती उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश युवकांना छत्रपती शिवाजी महाराजांनी दाखविलेल्या शौर्य, सुशासन व राष्ट्रनिर्मितीच्या आदर्शाशी पुन्हा जोडणे हा आहे. ही मेगा पदयात्रा महाराष्ट्रातील सर्व जिल्हयांत आयोजित करावयाची असून **मुख्य राज्यस्तरीय कार्यक्रम सातारा** येथे आयोजन करण्यात येत आहे. कारण छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनात साता—याचे ऐतिहासिक महत्व आहे. त्यानुषंगाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती निमित्त दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रिडा मंत्रालयामार्फत MY Bharat (मेरा युवा भारत) सातारा येथे **मेगा पदयात्रा (मुख्य राज्यस्तरीय कार्यक्रम)** आयोजन करण्यात येत आहे. तसेच राज्यात इतर जिल्हयात विद्यापीठे व विद्यापीठांतर्गत येणा—या महाविद्यालयांनी पदयात्रेचे आयोजन करावे.

या उपक्रमाचे व्यापक स्वरूप व महत्व लक्षात घेता, राज्यातील सर्व विद्यापीठे व विद्यापीठांतर्गत येणा—या महाविद्यालयांनी दिनांक १७ ते १९ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत खालीलप्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करावे.

- छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनचरित्रावर आधारित व्याख्याने आयोजित करणे.
- **छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनचरित्रावर आधारित कार्यशाळेचे आयोजन करणे.**
- छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनचरित्रावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणे.

तरी त्यानुषंगाने रा.से.यो. संलग्नीत सर्व महाविद्यालयांना सुचित करण्यात येते की, उपरोक्तपणे निर्देशित केल्यानुसार आपल्या महाविद्यालयात दिनांक १७ ते १९ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत कार्यक्रमांचे आयोजन करावे तसेच दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ रोजी आपल्या महाविद्यालयामार्फत MY Bharat (मेरा युवा भारत) अंतर्गत मेगा पदयात्रेचे जास्तीत जास्त रा.से.यो. स्वंयसेवकांना सहभागी करून घेवून आयोजन करावे व त्याबाबतचा अहवाल न चूकता रा.से.यो. विभागाच्या **nss@srtmun.ac.in** या ई—मेल वर पाठविण्यात यावा, ही विनंती.

डॉ. मारोती गायकवाड
संचालक
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

प्रत माहितीस्तव:
१) मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. कुलसचिव कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:
१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.

Scanned with OKEN Scanner